



दैनिक जनसामान्यांचे शस्त्र • बीड, छ.संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव •

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे — https://epaper.marathwadapatra.com

बीड • वर्ष ४ थे • अंक २४१ वा • पाने-४ • रविवार, दि.०८ डिसेंबर २०२४ • पान -१ • RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 • Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • dailymarathwadapatra2021@gmail.com किंमत ३ रूपये





# देशातील जनतेची दिशाभूल करू नका

## फडणवीसांचा शरद पवारांवर पलटवार!

मुंबई, दि.७ (मराठवाडा पत्र न्युज) :- राज्यातील विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाचा मोठा धक्का बसला.महाविकास आघाडीतील प्रमुख तीनही घटक पक्षांना अपेक्षेप्रमाणे कामगिरी करण्यात आली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या ५० जागा मिळाल्या तर दुसरीकडे महायुतीला २३१ जागा जिंकल्या. त्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून ईव्हीएमवर शंका व्यक्त केली जात आहे. तसेच, शरद पवार यांनीही आज मतदानाची आकडेवारी सादर करत महायुतीवर निशाणा साधला. याला आता राज्याचे मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी ट्विटद्वारे प्रत्युत्तर दिले आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीतील मतांची आकडेवारी सादर करत देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर पलटवार केला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मतं मिळूनही कमी जागा कशा? चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, भाजपाला मतं १,४९,१३,९१४ आणि

▶▶पान २ वर



## नेमकं काय म्हणाले शरद पवार?

महाराष्ट्रात निवडणुका झाल्यावर उत्साहाचं वातावरण असतं. मात्र, मला महाराष्ट्रात तसं वातावरण दिसत नाही. उगीच आरोप करणं योग्य नाही. कारण त्यासंबंधी ठोस असे पुरावे माझ्या हातात नाहीत. पण मतदानाच्या आकडेवारीवरून काही प्रश्न निर्माण होत आहेत. काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, तर त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख एवढे मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत. आम्ही प्रत्येक पक्षाला किती मते मिळाली आणि किती उमेदवार निवडून आले, याची आकडेवारी काढली. पण जोपर्यंत आमच्याकडे काही आधार नाही. तोपर्यंत भाष्य करणं योग्य नाही. पण मतांचे आकडे आश्चर्यकारक आहेत, असे शरद पवार यांनी सांगितले.

# पूजा खेडकर प्रकरणी मुख्य सचिवांसह जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजावा

## औरंगाबाद खंडपीठचे आदेश




पुणे, दि. ७ (मराठवाडा पत्र न्युज) :- प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्या याचिकेच्या अनुषंगाने मुख्य सचिव आणि अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. एस. जी. मेहरे आणि न्या. एस. जी. चपळ गावकर यांनी दिला आहे. पुढील सुनावणी १७ डिसेंबर रोजी ठेवली आहे. खेडकर यांचे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. त्या समितीने खेडकर यांना सुनावणीची संधी न देता एकतर्फी अहवाल तयार करून ३ डिसेंबरला सुनावणी ठेवली होती, असा आक्षेप घेत खेडकर यांनी खंडपीठात याचिका दाखल केली आहे. तसेच नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात अहिल्यानगर आणि पुणे येथील जिल्हाधिकाऱ्या ऐवजी राज्यातील कुठल्याही जिल्हाधिकाऱ्यांपुढे सुनावणीचे आदेश देण्याची विनंती खेडकर यांनी केली आहे.

## अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या जीवाशी चाललेला खेळ थांबवा

# बोगस औषध पुरवठा प्रकरणाची एसआयटी चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा-राजेभाऊ फड

परळी वैजनाथ, दि.७ (मराठवाडा पत्र न्युज):-स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे जवळपास तीन जिल्ह्यातील गोरगरीब जनतेसाठी जीवनदायी रुग्णालय आहे. दररोज हजारो रुग्णांवर येथे उपचार होतात. याच रुग्णालयात बोगस औषधाचा पुरवठा सुरू असल्याची बाब नुकतीच उघड झाली. याबाबत पोलिसांत गुन्हाही नोंद झालेला आहे. मात्र एवढ्यावर हे प्रकरण न थांबवता त्याच्या मुळाशी जाणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील प्रकरण हे गंभीर असून याची पाळेमुळे राज्यात इतर



ठिकाणीही असू शकतात. प्रशासकीय यंत्रणेतील अनेक बड्या लोकांचे यात हात असण्याची दाट शक्यता आहे. म्हणून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बोगस औषधांचा पुरवठा होत असल्याचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. शासनाने नेमून दिलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधाचा पुरवठा

▶▶पान २ वर

### उच्चस्तरीय चौकशी करा

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बोगस औषधांचा पुरवठा होणे ही गंभीर आणि निंदनीय बाब आहे. या गैरप्रकारात अनेकांचा हात असण्याची शक्यता आहे. सदरील शासकीय औषध पुरवठा कंत्राटदाराला कुणाच्या शिफारशी नुसार कंत्राट देण्यात आले? कोणत्या मंत्र्याचा? कोणत्या शासकीय अधिकाऱ्याचा यात सहभाग आहे? हा कंत्राटदार कुठून औषध उपलब्ध करत होता? कोणत्या

▶▶पान २ वर

# बालाजी देवस्थान जमीन अनियमितता प्रकरणातील कारवाईचा चेंडू अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे

बीड दि. ६ (प्रतिनिधी) धारूरमधील बालाजी देवस्थान जमीन अनियमितता प्रकरणात काहींची विभागीय चौकशी होणे आवश्यक असल्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल असताना आणि त्याला शासनाने अनुकूलता दाखविलेली असतानाही सदर प्रकरणाच्या चौकशीला खो घातला जात होता, आता या प्रकरणात कारवाईसाठी अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली. यामुळे आता या प्रकरणातील कारवाईचा चेंडू पुन्हा अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे टोलविण्यात आला आहे. धारूरमधील देवस्थान जमिनीच्या संदर्भाने जी अनियमितता झाली, त्यात प्रशासनातील अनेकांचे हात 'काळे' झाले होते. या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी माधव काळे आणि इतरांची विभागीय चौकशी होणे आवश्यक असल्याचा तसेच तत्कालीन उपजिल्हाधिकारी प्रकाश आघाव यांच्यावर शासनाने कारवाई करावी असा अहवाल शासनाला दिला होता. त्यानुसार शासनाने बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देखील दिले होते. मात्र मधल्या काळात या साऱ्याच चौकशीला खो घातला गेला. आघाडी यासंदर्भातील विभागीय चौकशीसाठी दोषारोपपत्र सादर करण्याचे उपजिल्हाधिकारी सामान्य यांनी दिलेले पत्र देखील रद्द केले गेले. बीडचे प्रभारी जिल्हाधिकारी पांचाळ यांनी या संदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार

▶▶पान २ वर

# वडवणी शहरातील आचारसंहितेमुळे महापुरुषांच्या चौकातील काढून टाकलेले ध्वज फडकविले

वडवणी, दि.७ (मराठवाडा पत्र न्युज):- विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकासह सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज नगरपंचायत प्रशासन व पोलिस बंदोबस्तात उतरविण्यात आलेले होते.तरी सामाजिक तरूणांनी एकत्र येऊन काल शनिवार रोजी सर्व महा पुरुषांच्या चौकातील ध्वज लावण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रशासनाने निवडणुकीची आदर्श



आचारसंहितीचे पालन करण्यासाठी राजकीय पक्षांचे फलक यासह इतर नियम पाळण्यासाठी तालुका प्रशासनाने मोहीम सुरू केलेली यामध्ये आचार संहितेची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने मोहीम सुरू केलेली आहे यामध्ये वडवणी शहरातील आचारसंहितेच्या कारणावरून नगरपंचायचे मुख्याधिकारी, कर्मचारी यांनी पोलिस बंदोबस्तात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, आण्णाभाऊ साठे, वसंतराव

▶▶पान २ वर

# द देवेंद्र

## दम दार आणि कसदार, आघाडीचा शत्रू






त्याला कुणी टरबुज्या म्हटले , लातूर ला त्यांच्या हेलीकाफटर ला अपघात झाला तर अनेकांनी त्याचा मृत्यू चिंतला, तो जणू महाराष्ट्राचा शत्रू म्हणत ज्या महाराष्ट्रात दुथडी लोंढे वाहिले त्या महाराष्ट्रात तो परत आला ते ही २३६ घेऊन, मोदींनी तोंडात बोट घालावीत ते ज्यांचे बोट धरून राजकारणात आल्याचे बोलतात ते शरद पवार जाणते १० मध्ये आणि देवेंद्र १३२, देवेंद्र यांचे यश १३२ नाही त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाचा परिपाक म्हणूनच पवार शिंदे यांचे पक्ष आणि त्यांचे आकडे आहेत, म्हणूनच देवेंद्र हे महाकाय ठरतात. सामाजिक अभिसरण, विजयाचे समीकरण, व्यवस्थित वितरित केलेले अर्थ कारण,या सर्व यंत्रणेचे आणि तीन ही पक्षाच्या यंत्रणेचे सुकानुधारी कुणी होते तर देवेंद्र फडणवीस. तुम्हाला आठवत महाराष्ट्राचा सोशल मीडिया देवेंद्र यांना महाराष्ट्राचा व्हिलन म्हणून जाहीर करून बसला होता, मराठा समाजाचे आंदोलन जे आपल्या नैतिक आणि वेदनेच्या जोरावर करो या मरो च्या टोकावर होते, मात्र दुर्दैवाने यात ओबीसी द्वेष पेरला गेला,असेल तसुभर तो मिडियाने मनभर केला, हे करवून घेताना मिडियाचे बूम सराटी मध्ये कसे राहतील याचे कसब कुणी तरी पणाला लावले यातून मराठा आंदोलन ओबीसीना एक करण्याचे निमित्त ठरले. ज्या वेळी मनोज जरांगे हे सागर च्या दिशेने लाखोल्या वाहत निघाले तेव्हा तो शांत होता शब्दाने तो बिथरला नाही, शिव्यांचा देखील सदउपयोग करून घेता येऊ शकतो हे त्याने दाखवून दिले, पेशन्स काय असतात आणि ते किती खोल आणि टोकाचे असू शकतात हे दाखवून देताना देवेंद्र यांनी ओबीसी सोबतच बारा बलुते गोळा केली, गावातला वारीक देखील जमा करताना देवेंद्र यांनी आपला व आपल्या पक्षाचा डी ए न ए जुळवून घेत अवघ्या ओबीसी कमळाच्या बागेत आणला. बारा बलुत्यात देवेंद्र हाच आपला नेता वाटायला मराठ्यांची भीती दाखवली गेली. मनोज जरांगे यांच्या आंदोलनात राजकीय पेरणी झाली, या काळात देखील त्याने आपले गडी निवडले, शिंदे आणि पवारांच्या पक्षात देखील देवेंद्र यांनी तिकीट दिलेले आणि निवडून आलेले चार आणे आमदार आहेत, म्हणूनच देवेंद्र यांना भजनलाल कुणी पर्याय न येता फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.शरद पवार यांचे १० आणि देवेंद्र फडणवीस यांचे १३२ हा सहज आणि साधा फरक नाही, हे अवचकली नाही, या साठी देवेंद्र यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे हे कुणाला नाकारता येईल का आणि नाकारल्याने आकडे बदलणार आहेत का, ज्या वेळी देवेंद्र दिवसरात्र सागर च्या समोर मंडप टाकून बारा बलुत्यांच्या बैठका घेत होते त्या वेळी शरद पवार ३२ खासदार आल्याने निवांत होते, शिंदे पवारांना पक्ष देऊन भाजपच्या जुळवणीत देवेंद्र महायुतीचे नेते बनले होते, या वेळी आघाडीच्या सेना कोंग्रेस दरम्यान साधा सवांद तरी होता का ? सांगली च्या जागेवर सेना आणि काँग्रेस मध्ये झालेला वाद पुढे तरी निवळला का, निवडणूक तोंडावर असताना पटोले आणि संजय राऊत दरम्यान वाकयुद्ध चालूच होते, मराठ्यांना दाखवून ओबीसी जमा करण्यात आले, जाहीर यादीत ९० टक्के हिंदू उमेदवारांना निवडून द्या म्हणणारे सज्जाद नोमानी यांच्याकडे बोट दाखवून देवेंद्र यांनी वोंट जिहाद च्या नावाने हिंदू मते रात्रीतून कमळाकडे नेली तेव्हा शरद पवार काय करत होते. शरद पवार यांचा केवळ आकड्यात पराभव झाला नाही, त्यांच्या हयातीत त्यांना नामोहरम करणारा पर्याय समोर आलाय, त्यांच घर फोडून त्यांना १० मध्ये अडकवून ठेवत १३२ असलेला तो नेता आपण शरद पवारांना उजवे मुत्सद्दी असल्याचे

▶▶पान २ वर


जनसामान्यांचे शस्त्र,दैनिक

मराठवाडा पत्र

दिनदर्शिका 2025

E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com | https://epaper.marathwadapatra.com

प्रिय वाचक / जाहिरातदार

या वर्षी आम्ही दै.मराठवाडा पत्र नवीन वर्षानिमित्त दर्जेदार दिनदर्शिका-2025 प्रकाशित करणार आहोत. ही दिनदर्शिका महाराष्ट्रातील घराघरात जाणार आहे. तरी आपण आपली वैयक्तिक फर्म, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, एजन्सी, वाढदिवस, उद्योगधंदे, व्यवसाय यांची जाहिरात देऊन सहकार्य करावे ही विनंती.

जाहिरात दरपत्रक


- ☐ 15000/-
- ☐ 10000/-
- ☐ 7000/-
- ☐ 5000/-

दिनदर्शिका 2025




संपादक : श्री.दत्तात्रय नरनाळे मो. 9822152955

# भाषेची तहान




'ब्रेन रॉट' हा शब्द ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचा 'या वर्षाचा शब्द' (वर्ड ऑफ द इयर २०२४) आहे, या संदर्भाचे महत्त्व भाषेवर मन:पूत प्रेम असल्याशिवाय कळू शकत नाही आणि जो हे असे प्रेम करतो त्याला खरे तर भाषा ही किती सुंदर गोष्ट आहे, हे फक्त समजलेलेच नाही, तर उमगलेलेही असते. त्या बाबतीत आपली कथा काय वर्णावी? कारण 'शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन' असे म्हणणाऱ्या तुकोबांची परंपरा सांगणाऱ्या मराठी माणसाने आपली भाषा इंग्रजी आणि हिंदीच्या दावणीला कशी बांधली आहे, याचे दाखले रोजच्या रोज मिळत असतात. आपल्या लहानग्याला बालवाडीऐवजी 'प्ले ग्रुप'मध्ये घालून तिथपासूनच मराठी भाषेच्या नष्टचर्याची पालखी वाहणाऱ्या मराठी माणसाला स्वभाषेचा न्यूनगंड वाटतो, हे काही लपून राहिलेले नाही. आपल्याच माणसांकडून अशी अवहेलना जगात इतर कोणत्या भाषेच्या वाट्याला क्वचितच येत असेल. भाषेवर प्रेम करणारे आणि तिचे पांग फेडू इच्छिणारे मात्र भाषेशी मराठी माणसासारखे वागत नाहीत. त्यांचे भाषेच्या प्रांतात चालणारे प्रयोग हे त्यांना लागलेल्या भाषेच्या तहानेचे द्योतक आहेत. त्याचे एक उदाहरण म्हणजे १९७१ मध्ये जर्मन भाषेत सुरू झालेली 'या वर्षीचा शब्द' म्हणजेच 'वर्ड ऑफ द इयर' ही परंपरा. ती हळूहळू इतर देशांमध्ये, इतर भाषांमध्ये पसरत गेली. त्या त्या वर्षी सगळ्यात जास्त प्रमाणात वापरल्या गेलेल्या शब्दाची दखल या 'वर्ड ऑफ द इयर' उपक्रमातून घेतली जाते. त्यातून त्या वर्षातली लोकांची मानसिकता, त्यांचा कल, त्या वर्षभरातील चर्चाविश्व, बदलत चाललेले जग या सगळ्याचा आवाका उमगतो. आता तर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसशिवाय कोलिन्स, केम्ब्रिज, मरियम–वेबस्टर डिक्शनरी, डिक्शनरी डॉट कॉम या वेगवेगळ्या शब्दकोश निर्मिती संस्थांकडून त्यांच्या दृष्टीने त्या त्या वर्षात कोणता शब्द महत्त्वाचा ठरला ते प्रसिद्ध केले जाते. त्यांच्या मते तो शब्द त्या वर्षभरात या शब्दकोशांमध्ये सगळ्यात जास्त शोधला गेलेला असतो आणि सगळ्यात जास्त वापरला गेलेला असतो. तर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचा या वर्षीचा मानकरी आहे 'ब्रेन रॉट' हा शब्द. हा शब्द आजकाल तयार झालेला, वापरात आलेला असेल असे वाटावे तर तसेही अजिबात नाही. या शब्दाचा वापर १७० वर्षांपूर्वी हेन्री डेव्हिड थोरोच्या 'वॉल्डन' या पुस्तकात झाला होता. 'बटाट्यांचे सडलेपण कमी करण्यासाठी समाज प्रयत्न करतो आहे, तर मेंदूचे सडलेपण कमी करण्यासाठी का प्रयत्न करत नाही? मेंदूचे सडलेपण हा आजार तर जास्त पसरलेला आणि जीवघेणा आहे.' असे त्यांनी आपल्या पुस्तकात म्हटले होते. म्हणजे मेंदूच्या सडण्याविषयीचा हा स्पष्ट आणि थेट उल्लेख होता. पण १७० वर्षांनंतर मात्र तो अगदी आजच्या, ताज्या संदर्भात वापरला गेला आहे. तो संदर्भ आहे समाजमाध्यमांचा. हातात मोबाइल घेऊन समाजमाध्यमांवर सर्फिंग करत बसलेल्यांच्या नजरेसमोर अत्यंत सुमार दर्जाची रील्स एकामागून एक येत राहतात आणि तो किंवा ती ही रील्स कसलाही विचार न करता तासनतास बघत राहतात. जिचा मेंदू सडलेला आहे आणि आता ती विचार करू शकत नाही, अशी व्यक्तीच अशा पद्धतीने हा सामान्य कंटेण्ट पाहण्यासाठी आपला वेळ वाया घालवू शकते, अशा अर्थाने 'ब्रेन रॉट' हा शब्द गेल्या वर्षभरात २३० टक्के वेळा वापरला गेला म्हणे. 'डेम्यूर', 'स्लोप', 'डायनॅमिक प्रायसिंग', 'रोमँटसी' आणि 'लोर' या पाच शब्दांना मागे टाकत ३७ हजार लोकांनी 'ब्रेन रॉट' या शब्दाला 'या वर्षा'चा शब्द म्हणून पहिली पसंती दिली. आता मेंदू अशा पद्धतीने खरोखरच सडतबिडत नाही, हे सगळ्यांनाच माहीत असते, पण थोरोने वापरलेला हा शब्द आजच्या समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापराशी जोडून समाजाला आरसा दाखवण्याचे काम करणारे डोके खरोखरच सुपीक म्हणायला हवे. जाता जाता सांगायचे म्हणजे याआधी 'रिज', 'गॉब्लिनमोड', 'सिच्युएशनशिप', 'पॅरासोशल' हे शब्द ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे त्या त्या वर्षाचे मानकरी ठरले होते. कोलिन्स डिक्शनरीचा २०२४ या वर्षाचा शब्द आहे 'ब्रॅट'. स्वतंत्र, आत्मविश्वासपूर्ण भोगवादी व्यक्ती या अर्थाने तो वापरला गेला आहे. 'ब्रॅट' हा शब्द याआधीही शब्दकोशामध्ये होताच, पण तो द्वाड किंवा वांड मूल (बहुतेकदा मुलगाच), टग्या बापाचे पोर यासंदर्भात वापरला जात असे. एक्ससीएक्स या गायिकेच्या याच नावाच्या अल्बमपासून प्रेरणा घेऊन तो समाजमाध्यमांमध्ये नव्या अर्थाने वापरला जायला लागला. हा शब्द 'अँटी टुरिझम', 'रोमँटसी', 'सुपर मेजॉरिटी' या शब्दांशी स्पर्धा करत कोलिन्स डिक्शनरीत यंदा मानाचे पान पटकावून बसला; तर 'शेफ्स किस', 'बूप' या शब्दांना मागे सारून केम्ब्रिज डिक्शनरीत 'मॅनिफेस्ट' या शब्दाने बाजी मारली. खरे तर हा शब्द अजिबातच नवीन नाही. पण जेन झी (१९९० ते २००० च्या दरम्यान जन्मलेली पिढी) एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ते सतत डोळ्यासमोर ठेवणे या अर्थाने समाजमाध्यमांमध्ये तो सतत वापरत असल्यामुळे तो 'वर्ड ऑफ द इयर' ठरला आहे. तर पारलिंगी टिकटॉक–स्टार जूल्स लेब्रॉनने तिच्या व्हीडिओत वापरलेला 'डेम्यूर' हा शब्द डिक्शनरी डॉट कॉमने 'या वर्षा'चा शब्द ठरवला आहे. एरवी 'मर्यादशील' या अर्थाने तो वापरला जात असला तरी लेब्रॉनने तो एखाद्या व्यक्तीच्या सामाजिक वावराचे वर्णन या अर्थाने वापरला आणि तो त्याच अर्थाने वर्षभर समाजमाध्यमांमध्ये रूढ झाला. इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया, डेन्मार्क, नॉर्वे, पोर्तुगाल, स्पेन, स्वित्झर्लंड, रशिया, युक्रेन, जपान अशा वेगवेगळ्या देशांमध्ये भाषेचे प्रवाहीपण जोखणारा आणि अधोरेखित करणारा हा 'वर्ड ऑफ द इयर'चा प्रयोग गेली काही वर्षे केला जातो आहे. या वर्षाचे म्हणून निवडल्या गेलेल्या काही निवडक शब्दांवर नजर टाकली असता लक्षात येतो तो समाजमाध्यमांचा प्रभाव. 'ब्रेन रॉट' हा शब्द समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरावरच टिप्पणी करतो, तर बाकीचे शब्दही या ना त्या संदर्भात गेल्या वर्षभरात या माध्यमांवर मुळातल्यापेक्षा वेगळ्या अर्थाने रूढ झाले. आजचे सगळे जगणे व्यापून टाकणारा समाजमाध्यमांचा भस्मासुर या भाषांच्या बाबतीत मात्र नव्या पिढीबरोबर नवे अर्थ घेऊन येतो हे कोडे काहीसे न उलगडणारेच म्हणायला हवे. हे इतर भाषांच्या बाबतीत होत असेल तर मायमराठीच्या बाबतीत का होऊ नये? की शब्दांना नवनवे अर्थ प्रसवण्याइतका प्रवाहीपणा मराठी भाषेमध्ये आता उरलेलाच नाही? थोरोचा एखादा शब्द १७० वर्षांनंतरही तरुण पिढीला आपलासा वाटू शकतो, तर आपल्या ज्ञानेश्वरांचा एखादा शब्दही नव्या काळाचा नवा साज घेऊन का अवतरू नये? एके काळी आपली समृद्ध परंपरा जपतानाच इतर भाषांमधले शब्द आत्मसात करत आणखी श्रीमंत होत गेलेल्या मराठीने जगण्यामधले नवे प्रवाहही सामावून घेणे थांबवले आहे की काय? इतर भाषांमध्ये 'या वर्षी' सगळ्यात जास्त वापरलेला शब्द कोणता ते तपासण्याची, शोधण्याची प्रेरणा असू शकते, तर तीच तहान मराठी भाषकांनाही का लागू नये? स्वत:च्या भाषेबद्दल कमालीची अनास्था हेच मराठी माणसाचे व्यवच्छेदक लक्षण का झाले आहे? आपल्या भाषेचे पूर्वसंचित जपून ठेवण्याचे भान नसणे हे मराठी माणसाचे 'ब्रेन रॉट'च नाही का?

## एमकेसीएलच्या वतीने अंबाजोगाईच्या कंम्पूटर वर्ल्डचा पुरस्काराने गौरव



अंबाजोगाई, दि. ७ (मराठवाडा पत्र न्युज) :– महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) च्या वतीने घेण्यात आलेल्या सुंदर व स्वच्छ केंद्र स्पर्धा २०२४'' या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या वार्षिक सभेत अंबाजोगाई येथील प्रा. संतोष मोहिते यांच्या कॅम्पुटर वर्ल्ड ला जिल्ह्यातून द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. एमकेसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका वीणा कामथ यांचे हस्ते कंम्पूटर वर्ल्ड चे संचालक संतोष मोहिते यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. गेल्या २० वर्षा पासून अंबाजोगाई व परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम घडविण्याचे काम सातत्याने कंम्पूटर वर्ल्डच्या माध्यमातून केले जाते. या मुळे दरवर्षी एमकेसीएल कडून सातत्याने विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. यावेळी महामंडळाचे अमित रानडे, अतुल पतौडी, दीपक पाटेकर विभागीय समन्वयक बालकिशन बलदवा, गजानन कुलथे लोकल लीड सेंटरचे गजानन पांचाळ हे उपस्थित होते. प्रा. संतोष मोहिते यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## ''मी १४ निवडणूक लढलो, कधीही पराभव नाही; पण यावेळी'', शरद पवारांचं निकालावर मोठं विधान



मुंबई, दि. ७ (वृत्तसंस्था):–महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारूण पराभव झाला. तीनही घटक पक्षांना अपेक्षेप्रमाणे कामगिरी करण्यात आली आहे. या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते शरद पवार यांनी बरेच दिवस बोलणे टाळले होते. पण आता ते निकालाचे विश्लेषण करताना दिसत आहेत. उद्या (८ डिसेंबर) ते सोलापूरच्या माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी या गावात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत. या गावातील लोकांनी पुन्हा एकदा मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी केली होती. आज कोल्हापूर येथे पत्रकार परिषदेत बोलत असताना शरद पवार यांनी विधानसभा निकालासह अजित पवार यांना मिळालेली क्लीन चीट, इंडिया आघाडीतील वाद, अबु आझमी यांचा मविआला सोडचिठ्ठी अशा विविध विषयांवर सडेतोड भाष्य केले.

**मी १४ निवडणूक लढलो, पण...**

पराभवाचे विश्लेषण करताना शरद पवार म्हणाले, ''महाविकास आघाडी यापुढील काळातही एकत्रित निवडणुकांना सामोरे जाणार आहे. पराभव झाला म्हणून नाउमेद व्हायचे नसते. निवडणुकीला काही पर्याय नसतो. मी आयुष्यात १४ निवडणूक लढलो, मला कधीही पराभव पाहावा लागला नाही. पण यावेळेला राज्यात आम्हाला पराभव पाहायला मिळाला. जरी पराभव आला तरी चिंता करायची नसते. लोकांमध्ये जावे लागते आणि लोक चिंताग्रस्त आहेत, असे आम्हाला दिसते. लोकांमध्ये उत्साह दिसत नाही. निवडणूक झाल्यानंतर एक उत्साह दिसतो, तो मात्र यावेळेला दिसत नाही.'' निकालाबाबत पुढे बोलत असताना शरद पवार यांनी हेही स्पष्ट केले की, ईव्हीएमवर आमची शंका नाही. कारण त्यासंबंधी ठोस असे पुरावे माझ्या हातात नाहीत. पण मतदानाच्या आकडेवारीवरून काही प्रश्न निर्माण होत आहेत. शरद पवार पुढे म्हणाले, काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, तर त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख एवढे मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत.''

## फडणवीस साहेब सत्ता स्थापन झाली आहे ; शेतकऱ्यांची कर्जमाफी करा-अभिजीत पवार

बीड, दि. ७ (मराठवाडा पत्र न्युज):–ऐतिहासिक महाविजयानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांनी निवडणूक काळात मतदारांना दिलेली आश्वासने पुर्ण करण्यास प्राधान्यक्रम द्यावा. विशेषत: शेतकऱ्यांना कर्जमाफी देवून बळीराजाला अस्मानी संकटातून बाहेर काढावे. निवडणूक लागल्यानंतर प्रचारा दरम्यान महायुतीच्या अनेक उमेदवारांनी आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी करू अशा घोषणा केल्या होत्या. आता सरकार स्थापन झाले आहे, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब शेतकऱ्यांचे लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावे शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अशी मागणी अभिजीत पवार यांनी केली आहे.



कोणतेही निकष व कोणत्याही अटी न लावता शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी. निवडणुकीला समोर जाण्यापूर्वी शिंदे सरकारने लाडकी बहिण योजना लागू केली होती. सरकार पुन्हा सत्तेत आले तर या योजनेतून महिलांना महिनाकाठी २,१०० रूपये देण्याचे आश्वासन दिले गेले होते, आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी करू असे हे आश्वासन दिले होते, हे आश्वासन सरकारने तत्काळ पुर्ण करावे.योजनेच्या माध्यमातून राज्याच्या तिजोरीवर पडणारा ताण कमी करण्याचे आव्हान सरकार समोर राहणार असले तरी, आश्वासनांची पुर्तता करण्यावर सरकारने ठाम राहिले पाहिजे, असे मत पवार यांनी व्यक्त केले आहे.

### प्रचारादरम्यान दिलेले आश्वासन पूर्ण करा..

राज्यातील शेतकरी संपूर्ण कर्जमाफीसोबतच सोयाबीन भावांतर योजना लागू करण्याची मागणी करत आहेत. त्याचं कारण भाजप आणि महायुतीनं सत्तेत आल्यानंतर कर्जमाफी देऊ, सोयाबीनसाठी भावांतर योजना राबवू असं आश्वासन शेतकऱ्यांना जाहीरनाम्यात दिलं होतं. आता महायुती सरकार सत्तेत आले आहे महायुती सरकारने दिलेले आश्वासन लवकरात लवकर पूर्ण करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा. होणाऱ्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी कर्जमाफी आणि सोयाबीन भावांतरचा मार्ग मोकळा करा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत महायुती सरकार दोन्ही निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलेलं आश्वासन पूर्ण करेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज आहे. शेतकऱ्यांनी सोयाबीन हमीभावाच्या खाली विकलं आहे/ विकत आहेत. सरकारनं सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना तातडीनं भावांतर योजना लागू करावी. कारण सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचं जे नुकसान व्हायचं होतं ते झालं आहे. त्यामुळं भावांतर योजनेतून सोयाबीन उत्पादकांना दिलास देण्याचा निर्णय सरकारनं घ्यावा, आणि सरकारने लवकरात लवकर शेतकऱ्यांची कर्जमाफी सुद्धा करावी अशी मागणी अभिजीत पवार यांनी केली आहे.

दै. मराठवाडा पत्र साठी बीड शहर प्रतिनिधी नेमणे आहे.
::: संपर्क :::
९८२२१५२९५५

## बलभीम नगर बुध्द विहार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन




बीड, दि. ७ (मराठवाडा पत्र न्युज):– ०६ डिसेंबर २०२४ रोजी बलभीम नगर बुद्ध विहार, शिवाजी नगर पालवण रोड बीड येथे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या महापरी निर्वाण दीना निमित्त अभिवादन सभेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास प्राध्यापक विक्रम धन्वेसर व ॲड राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती,या कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी नगर, दिलीप नगर, बलभीम नगर येथील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून दिलीप नगर ते बलभीम नगर बुद्ध विहार पर्यंत कॅण्डल मार्च काढून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले त्या नंतर, सामूहिक त्रिसरण पंचशील घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली दिली त्या वेळी प्रा. विक्रम धन्वेसरानी मुक्तीदाते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना संबोधित करताना म्हणाले बाबासाहेब यांनी त्याच्या आयुष्यात घडलेल्या अन्याया मुळे कधीही कोणाचाही द्वेष, राग, मनात न ठेवता बुद्ध धम्मच्या मार्गाने दुःख मुक्त जीवन जागून महापरीनिर्वाणास प्राप्त झाले त्यानी सर्वांच्या हिताचे संविधान लिहून प्रत्येकाला स्वातंत्र्य,समानता, न्याय, बंधुता मिळून दिले आहे अश्या या मुक्तीदात्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जो व्यक्ती जगतो त्यांनाच ते पाहातील जे बाबासाहेब यांना जगणार नाहीत त्याना बाबासाहेब कधीच दिसणार नाहीत बाबासाहेब हे मूर्तित, पूजेतनासून विचारात आहेत त्याना पूजण्याची नाहीतर त्याना वाचण्याची आजच्या पिढीला गरज आहे हे मोलाचे मार्गदर्शन देऊन सरणंतय घेऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा महापरीनिर्वाण दिना निमित्त अभिवादन करून संपन्न झाला या कार्यक्रमाचे आयोजन ॲड तेजस वडमारे,व अंजली तेजस वडमारेयांनी केले या कार्यक्रमास सिद्धार्थ वडमारे, मंगेश वडमारे, दिलीप गवळी,सिद्धार्थ विद्यागर, छब्बू जाधव, सरिता खेमाडे, पंचफुला वाघमारे,वर्षा खेमाडे, शिवकन्या खेमाडे, उषा जाधव, हौसाबाई वाघमारे, कोमल वाघमारे, शिला साळवे, आशा भालेराव,मीना अंकुटे संगीता जाधव,शकुंतला ससाणे मॅडम,जयश्री गवळी, विद्यागार ताई,आचल वडमारे, हर्षदा साळवे, सिंधूबाई जाधव,नितीन भालेराव, गणेश खेमाडे, सिद्धार्थ साळवे, विराज साळवे, निशांत वडमारे, अमय वडमारे,पूजा वाघमारे, आरोही अंकुटे, आर्यन खेमाडे,डॉली वडमारे,विश्वास शिंदे व परिसरातील उपासक उपस्थित होते.

पान १ वरून

### देशातील जनतेची...

जागा ९, पण काँग्रेसला मतं ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मतं आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी–शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मतं आणि ८ जागा.'' याचबरोबर, ''२०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मतं होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मतं होती आणि जागा ४ आल्या'', असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांना पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल, असे म्हटले आहे. तसेच, शरद पवारांनी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला देण्याची अपेक्षा सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

### बोगस औषध पुरवठा...

केल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले. याबाबत अंबाजोगाई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील बोगस औषध पुरवठा प्रकरणात गुजरात आणि ठाणे जिल्ह्याचे कनेक्शन असून ही टोळी राज्यात आणि आंतरराज्य सक्रिय असण्याची दाट शक्यता आहे. गोरगरीब रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. गोरगरीब रुग्णांना खाजगी दवाखान्यात उपचार घेणे परवडत नाही, त्यांच्यासाठी हे शासकीय रुग्णालये वरदान ठरतात. तिथे असे प्रकार उघडकीस होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासकीय यंत्रणेत अशा स्वरूपाचा भ्रष्टाचार ही नक्कीच हादरविणारी बाब असून, यातील सर्व दोषींची सखोल चौकशी व्हावी आणि त्यांना कठोर शिक्षा करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

पान १ वरून

### उच्चस्तरीय चौकशी...

कंपन्यांशी त्याचे हितसंबंध आहेत? जिल्ह्यातील कोणते शासकीय अधिकारी यात सहभागी आहेत? याची नि:पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी एसआयटी पथक नेमून या प्रकरणाचे पाळेमुळे शोधावेत व दोषींना शिक्षा करावी अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे.

### द देवेंद्र...

त्याने दाखवून दिले नाही का, मधुकर भावे यांना आता यशवंतराव ते देवेंद्र असे पुस्तक लिहावे लागेल आणि शरद पवारांच्या पेक्षा एक पान अधिक देवेंद्र फडणवीस यांच्यावर लिहावे लागेल . एका रांगेत आणून मुस्लिम मराठा दाखवून ओबीसी आणि हिंदूचे मते जमवनारे फडणवीस कसले भयाण व्यवस्थापक ठरतात . कुणाच्या लक्षात येईल न येईल मात्र शरद पवाराना ही वाघूर लक्षात यायला हवी होती , किमान ज्यांना कुणाला ही कुणकुण लागली अश्या लोकाना पवार वा आघाडीने कधी संपर्क केला आहे का . केवळ भाजपची भीती दाखवून मते मिळत नाहीत , मतविभाजन नावाचा देखील एक अध्याय निवडणूक नावाच्या ग्रंथात असतो हे पवारांना कुणी सांगायची गरज आहे का? आघाडी अजून तरी सुधारणार आहे का नाही , जयंत पाटील आणि रोहित पवार यांचे उभे गट निर्माण होणार असतील तर

पान १ वरून

पक्ष फुटलेल्या खेम्यात लोकांना तरी का राहावे वाटावे , पवारांनी पक्ष फोड रोखली नाही , किमान उरलेल्या पक्षात गटबाजी तरी रोखायची . अजित पवार येणाऱ्या काळात शरद पवारांच्या जागी महाराष्ट्र हाती घेणार नाहीत ते पुतणे अजित कसले , भुजबळ मुंडे तटकरे सारखे ओबीसी स्तंभ घेऊन मराठा म्हणून अजित पवार येणाऱ्या ५ वर्षात महाराष्ट्र बांधतील तेव्हा शरद पवार यांच्या पक्षात आणखी गट पडतील का ? शिंदेच्या सत्तेपूढे मातोश्रीचे सैनिक तग धरतील का , १६ वर येऊन ठेपलेली कोंग्रेस आता तरी सुधारून नव्या दमदार लोकांना संधी देणार आहे का , का स्थानिक स्वराज्य संस्था देखील भाजपला बहाल करणार आहे ? आघाडीच्या नेत्यात स्वतचे साम्राज्य अबाधित राहावे करिता नवीन लोकांना येउच द्यायचे नाही असे धोरण आहे , किमान ५ वर्षे उपाशी असताना लढण्यासाठी येणारे सोबती तरी मानपणाने आघाडी घेणार आहे का. असेच राहिले तर पुढची निवडणूक फडणवीस अजित पवार आणि शिंदे यांच्यात होईल , बाकी आघाडी एकमेकात कुरघोड्या करण्यात हतबल असेल , कारण फडणवीसानी केवळ निवडणूक जिंकली नाही , त्याने पटच त्याच्या वतीचा करून घेतला आहे , आणि हो मशीनच्या नावाने तक्रार केली जाऊ शकते मात्र म्हणून देवेंद्र यांनी घेतलेली मेहनत आणि विजयाची प्रत्येक संधी घेण्यासाठी जेवढ्या म्हणून त्यांनी काड्या केल्या त्याचा परिपाक हा विजय नाही का ? आघाडीने आपल्या शत्रूकडून प्रचंड शिकावे असेच देवेंद्र आहेत .. तूर्तास तरी

पान १ वरून

### बालाजी देवस्थान...

या प्रकरणात कारवाई करण्यासाठी अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी बोलताना सांगितले.

### वडवणी शहरातील...

नाईक चौक , संभाजी महाराज चौक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, अहिल्यादेवी होळकर, संत सेवालाल महाराज चौक, संत सेना महाराज चौक यासह महापुरुषांच्या चौकातील ध्वज काढून टाकण्यात आले होते. याअगोदर प्रशासनाने झालेल्या निवडणुकीत महापुरुषांच्या चौकातील ध्वज काढून टाकण्यात आले नव्हते तरी घटनेचा सोशल मीडियातुन समाज बांधवांनी तिव्र संताप व्यक्त करून प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त केला होता.तरी या सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज काल शनिवार रोजी सामाजिक तरूणांनी एकत्र येऊन सन्मानाने लावण्यात आले आहेत. हे सामाजिक कार्य सतिश मस्के, अतुल मस्के, पत्रकार अविनाश मुजमुले, अमोल मस्के या चौघांनी मिळुन केले आहे. तरूणांनी राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. यावेळी डिसीसी बँकेंचे संचालक अमोल आंधळे, युवराज शिंदे, मुन्ना मुंडे, शिवाजी तौर,ॲड. भास्कर उजगरे, अकबर भाई, सुरेश भोरे, सुग्रीव मुंडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. तुकाराम आडे, पत्रकार विनायक जाधव, पत्रकार रामेश्वर गोंडे, प्रेमदास राठोड, शहाजी लोकरे, संभाजी दराडे, कृष्णा शिंदे, महादेव सावंत, बाळु आडे, प्रशांत डिगे, चक्रधर हेंद्रे, सुरज शिंदे, अनिल शिंदे, सह आदी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# समझोता करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला

▸ तिघांवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जुन्या वादावर बोलून समझोता करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तिघा भावांनी तलवार, लाठ्या-काठ्यांनी प्राणघातक हल्ला चढविला. याप्रकरणी तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.

विनोद वसंत ढवारे (वय ३०, रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) असे हल्लयात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. विनोदच्या फिर्यादीनुसार त्याच्या गावातील सुरज संतोष वाघमारे याने विनोदचे भाऊ महादेव, शंभू आणि आकाश यांच्या विरोधात अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली होती. सदर वाद चर्चेतून सामोपचाराने मिटविण्यासाठी विनोद, विलास कुराडे, विनोद बलवंत आणि भाऊ आकाश हे बुधवारी (दि.०४) रात्री ८ वाजता सुरज वाघमारे याच्या घराकडे गेले. त्या ठिकाणी वाद मिटविण्याबाबत चर्चा सुरु असताना सुरज घरात गेला आणि लोखंडी तलवार आणून त्याने विनोदवर वार केला. तर त्याचे भाऊ संतोष आणि शिवम यांनी विनोदला लाकडी दांड्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी विनोद सोबत आलेल्या ग्रामस्थांनी त्याला हल्लेखोरांच्या तावडीतून वाचविले आणि उपचारासाठी स्वाराती रुग्णालयात दाखल केले. सदर फिर्यादीवरून सुरज संतोष वाघमारे, मनोज संतोष वाघमारे आणि शिवम संतोष वाघमारे या तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. गुन्हा दाखल होताच सुरज वाघमारे यास पोलिसांनी अटक केली असून उर्वरित दोघे फरार आहेत. पुढील तपास एपीआय रंगनाथ जगताप करत आहेत.



*मुंबई येथे मा.आ.श्री धनंजयजी मुंडे साहेब मा.आ.श्री.विजयराजे पंडित साहेब यांची आज भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते अशोकराव हिंगे, रमेश चव्हाण, भाऊसाहेब डावकर, शिवसेना जिल्हासंघटक सुनील सुरवसे उपस्थीत होते.*



*समर्थ कार डेकोर चे सर्वे सर्वा श्री.संतोष लहुराव बादाडे यांचा वायाभटवाडी येथे श्री.हनुमान दर्शन व आरती करण्यात आली व नंतर इन्फंट इंडिया आनंदग्राम पाली येथे मुलांसोबत एक आनंदाचा क्षण हणून त्यांना फळे व सकाळी नास्था देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. सोबत दत्ता बारगजे भाऊ, संध्या बरगजे ताई संतराम ढाकणे, मुंडे राम , महादेव डोंगरे, सनी गुंजाळ,रुहिकेश देवकुळ, सागर घोडके, प्रकाश रुपनर, गायकवाड बप्पा, व अशांका खांडे आदी उपस्तित होते..*

## देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत विवाह सोहळा संपन्न

# यात्रेत सोमवारी रंगणार कुस्त्यांची दंगल

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत खंडेरायाची मोठी यात्रा भरते. याच पार्श्वभूमीवर शनिवारी पहाटे सुर्योदयापूर्वी खंडेरायाच्या लग्नाचा पारंपारिक सोहळा पार पडला. देवाच्या विवाह सोहळ्यास हजारो भाविक भक्तांनी उपस्थिती लावली. यात्रेत सोमवारी कुस्त्यांची जंगी दंगल रंगणार असून पहिलवान व कुस्ती शौकीन मंडळींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



चंपाषष्ठी निमित्त सबंध महाराष्ट्रात ठिकठिकाणी खंडोबाची यात्रा भरते. देव दहिफळ येथे तब्बल दोन महिने ही यात्रा चालते. नागदिवे पूजन दिवशी दिंद्रुड येथील मानाची खंडोबा काटी तसेच मोगरा, नाकलगाव आणि बाबळगाव येथील पालखी दहिफळ येथे दाखल झाल्या. रात्री शोभेची दारू उडवण्यात आली. दि.७ शनिवारी चंपाषष्ठीच्या पहाटे सुर्यदयापूर्वी खंडोबा देवाचे म्हाळसा देवी सोबत लग्न लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. हजारो भाविक भक्तांनी देवाच्या लग्नास उपस्थित राहून दर्शन घेतले.

यात्रेनिमित्त सोमवारी कुस्त्यांची जंगी दंगलीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती श्री खंडोबा देवस्थान कमिटी कडून देण्यात आली. कुस्तीच्या दंगलीतील कुस्ती स्पर्धे मध्ये १० रुपया पासुन ते ५१०१ रुपयांची बक्षीस दिली जाणार आहेत. बीड जिल्हा व मराठवाड्यातील कुस्ती प्रेमींना कुस्तीच्या दंगलीस उपस्थित राहण्याचे आवाहन देवदहिफळचे सरपंच श्रीधर बडे यांनी केले आहे. सरपंच श्रीधर बडे,माजी जि.प.सदस्य विलासराव बडे, श्रीहरी बडे, शिवाजीराव बडे, दिलीप बडे, राज बडे, सुग्रीव बडे, रमेश बडे, दामोधर बडे, मुरलीधर बडे, नवनाथ बडे, विष्णुपंत बडे, राजेभाऊ बडे, गोपाळराव बडे, बबन कांदे, अंगद वड्डे, शेख तायेर, सुभाष कांबळे, राज आंधळे, बाळू तोडे, अंगद बडे, खंडू सहजराव, दामूआन्ना बडे, रामराव बडे, बाळासाहेब बडे, राधाकिसन बडे, उत्तम कांदे, वसंत तोंडे पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्या सह गावकऱ्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री अशोक शेजवळ यांची विद्यार्थिनीला आर्थिक मदत



बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते माननीय श्री अशोक शेजवळ सर यांनी बीड तालुक्यातील श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेर चिंचोली शाळेतील विद्यार्थिनी आलिया मझहर सय्यद हिला अडीच हजार रुपये आर्थिक मदत केली. सामाजिक कार्यकर्ते मा. अशोक शेजवळ सरांनी बॅनर चा खर्च टाळून गोर गरीब विद्यार्थ्याला आर्थिक मदत केली पाहिजे याच भावनेतून ते विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षी आर्थिक मदत करतात.यावेळी श्री नारायण विद्यालय मा. व उच्च मा. विद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवरावजी काळे अण्णा , संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर,दीपक ढेंगे, प्राध्यापक अशोक घरत सर ,श्री मरमुडे सर,श्री दामोदर काळे,सुमित कदम, यावेळी उपस्थित होते.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा



नेकनूर । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ढास डी. के यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांनी म्हटले की, युगपुरुष बाबासाहेब आंबेडकर आजही देशभरात प्रेरणास्त्रोत आहे. सामाजिक न्याय, शिक्षण आणि समता या क्षेत्रात त्यांनी सुरू केलेली क्रांती नेहमीच प्रासंगिक राहील. त्यामुळेच भारतीय इतिहासात ६ डिसेंबर ही महत्त्वाची तारीख म्हणून नोंदवली जाते. या दिवशी देशभरात महापरिनिर्वाण दिन म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली जाते. महापरिनिर्वाण म्हणजे बौद्ध धर्मातील आत्म्याची मुक्ती. आणि आंबेडकरांच्या महान आत्म्याला शांती आणि त्यांच्या अमूल्य सेवेचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुजावर एस. टी. यांनी केले तर आभार डॉ. राजेश आरदवाड यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आनंदऋषिजी हॉस्पिटल बीड येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलेसिस सेवा उपलब्ध

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे .

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत उपलब्ध . वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना डायलेसिस सेवा मोफत उपलब्ध. ायलेसिस असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च सेंटरमध्ये, आम्ही किडनीशी संबंधित आव्हानांना तोंड देत असलेल्या व्यक्तींना उच्च दर्जाची, वैयक्तिकृत डायलिसिस काळजी प्रदान करण्यासाठी समर्पित आहोत. आमची अत्याधुनिक सुविधा, अनुभवी वैद्यकीय संघ आणि रुग्ण-केंद्रित दृष्टीकोन हे सुनिश्चित करतात की प्रत्येक रुग्णाला त्यांच्या डायलिसिस प्रवासादरम्यान शक्य तितकी सर्वोत्तम काळजी मिळते.

वैशिष्ट्ये:- सुसज्ज फ्रेसेनियस कंपनीचे डायलिसिस युनिट उपचारांसाठी आरामदायक आणि स्वच्छ वातावरण प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. नेफ्रोलॉजिस्ट, परिचारिका आणि तंत्रज्ञांची आमची टीम डायलिसिस काळजीमध्ये अत्यंत कुशल आणि अनुभवी आहे, जे चोवीस तास सुरक्षित आणि प्रभावी उपचारांची खात्री देते. आम्ही प्रत्येक रुग्णाच्या विशिष्ट गरजा आणि प्राधान्ये पूर्ण करण्यासाठी वैयक्तिकृत काळजी, टेलरिंग उपचार योजनांना प्राधान्य देतो. हे देखील आढळून आले की ४०-६० मूत्रपिंड निकामी रुग्ण एचआयव्ही आणि हिपॅटायटीसने ग्रस्त आहेत, ज्यासाठी इतर मूत्रपिंड-निकामी रुग्णांना संसर्ग होऊ नये म्हणून आमच्याकडे स्वतंत्र / स्वतंत्र डायलिसिस मशीन आहे. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे.



*बीड जिल्हा वकील संघाचे सदस्य मा.ॲड. शेख शाहजेब यांच्या वाढदवसानिमित्त सप्रेम भेट देताना ॲड मीनहाज सय्यद, ॲड खालेक पठाण, नीतीन श्रंगारे अबरार पठाण व शेख फिरोज व इत्यादी दिसत आहे.*

## शिवणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ भदंत आनंद कौसल्यायन नगर मौजे शीवणी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना असंख्य उपासक, उपासिकांच्या उपस्तिथीत अभिवादन करण्यात आले. यावेळी उपासक आयु. अंकुश नाना डोळस, आयु. इंजि. वसंतराव तरकसे, रमेश कोरडे, विद्यागर बप्पा, भास्कर सरपते, कविता डोळस, रुतुजा डोळस, करिष्मा वक्ते, रतन वक्ते, जयाताई डोळस, मुद्रुकाताई डोळस, मनिषा प्रकाश डोळस, रोशनी डोळस, मौजे शीवणी आणि परिसरातील अनेक ऊपासक आणि ऊपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## श्री दत्त जयंती उत्सव निमित्त लोह्यात कार्यक्रमाचे आयोजन

लोहा । प्रतिनिधी

शहरातील देऊळ गल्ली येथे श्री दत्त जयंती उत्सवाच्या निमित्त आठ दिवस कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून या कार्यक्रमासाठी जय तयारी करण्यात आली आहे. ९ डिसेंबर २०२४ रोजी या श्रीदत्त जयंती उत्सवास प्रारंभ होणार असून या कीर्तनाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावे असे आवाहन ह भ प गुरुवर्य श्री लक्ष्मीकांत प्रभू महाराज लोहेकर श्री दत्त संस्थान देवालय लोहा यांच्या वतीने करण्यात आले आहे ९ डिसेंबर २०२४ पासून प्रारंभ होणाऱ्या श्रीदत्त उत्सवाच्या निमित्ताने कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली आहे. दररोज सकाळी चार ते पाच काकड आरती. सकाळी पाच ते सात श्री दत्त मूर्तीस अभिषेक सकाळी साडेआठ ते साडेनऊ गीता पारायण



दुपारी चार ते पाच ज्ञानेश्वरी पारायण सायंकाळी सहा ते सात हरिपाठ धुपारती अशा पद्धतीने रूपरेषा ठरविण्यात आली असून कीर्तनाचे कार्यक्रम पुढील प्रमाणे आहेत. ९ डिसेंबर २०२४ रोजी रात्री साडेआठ ते साडेदहा पर्यंत ह भ प आत्माराम महाराज रायवाडीकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम. १० डिसेंबर २०२४ रोजी ह भ प भालेराव गुरुजी यांचे कीर्तन ११ डिसेंबर २०२४ रोजी ह भ प सदाशिव महाराज मस्कीकर १२ डिसेंबर ह भ प चिंतामणी महाराज गंगाखेडकर १३ डिसेंबर माधव महाराज मिसाळ १४ डिसेंबर रोजी ह भ प लक्ष्मीकांत प्रभू महाराज लोहेकर तर सायंकाळी ह भ प भागवताचार्य दीपक गुरु पांगरेकर १५ १२ २०२४ ह भ प तुकाराम महाराज चव्हाण एकनाथ महाराज आळंदीकर १६ डिसेंबर २०२४ रोजी ह भ प लक्ष्मीकांत प्रभू महाराज लोहेकर यांचे काल्याचे किर्तन होईल. सदरील दत्त जयंती उत्सवानिमित्त कीर्तनाचे कार्यक्रम सद्गुरु धाम श्री दत्त संस्थान देऊळ गल्ली लोहा येथे आयोजित करण्यात आला असून भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने या कीर्तनाचा लाभ घेऊन श्री दत्त जयंती उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन श्री दत्त जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# बेलगावच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सतिष पोकळे यांची निवड

▸ आष्टी तालुका पत्रकारच्यावतीने सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय समितीच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्यपद निवडीसाठी आयोजित बैठकीत बेलगाव शाळा व्यवस्थापन समितीच्या ईश्वरी चिठ्ठी मध्ये अध्यक्षपदी आ.सुरेश धस यांचे समर्थक सतिष बापुराव पोकळे यांची निवड झाली आहे.





तर उपाध्यक्ष म्हणून श्रद्धा सचिन पोकळे, सदस्यपदी अण्णासाहेब आत्माराम पोकळे, प्रियंका अनिल सकुंडे ,रंजना नागेश शिंदे, महादेव मधुकर पोकळे, अशोक रोहीदास पोकळे, भाउसाहेब पोपट खंडागळे, नामदेव ज्ञानदेव घोडके, शिक्षण प्रेमी नागरिक सुधीर मारुती पोकळे, स्व. संस्था प्रतिनिधी बाळासाहेब लक्ष्मण पोकळे, शिक्षक प्रतिनिधी गणेश म्हस्के सचिव मुख्याध्यापक रघुनाथ खंडागळे यांची निवड झाली आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्याचे आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस, युवा नेते जयदत्त धस, सागर धस, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, एन.टी.भाऊ गर्जे,माजी पं.स. सदस्य किरण पोकळे, अँड.राकेश हंबर्डे, अँड.महादेव मोहिते, सरपंच तात्यासाहेब शिंदे, माजी सरपंच बन्सी भाऊ पोकळे, मोहन पोकळे, माजी उपसरपंच संजय पोकळे, माजी सरपंच संजय पोकळे, उपसरपंच सतीश पोकळे, अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार रघुनाथ कर्डीले, गणेश दळवी, सचिन रानडे, शरद रेडेकर, बाळासाहेब पोकळे, कृष्णा पोकळे, मनोज पोकळे, भाऊसाहेब पोकळे, ज्ञानदेव पोकळे, रामहरी पोकळे, संभाजी पोकळे,मारुती सरोद ,राजू खंडागळे, अंबादास पोकळे आदिंनी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

दैनिक • epaper.marathwadapatra.com
रविवार, दि.०८ डिसेंबर २०२४ पान ४

# मराठवाडा पत्र

• dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955


# अपार आयडी : मुदतवाढ देऊनही जिल्ह्यात नोंदणी केवळ ६२.३३ टक्के

## अपार कार्ड, आधार कार्ड लिंक असल्याने बोगस विद्यार्थ्यांची संख्या उघड

**अपार आयडी न काढलेल्या शाळा : आष्टी ५५ अंबाजोगाई ४१ बीड ४३ वडवणी ३ धारूर ६ गेवराई २ केज २५ माजलगाव १९ परळी २५ पाटोदा १५ शिरूर ८ बीड शहर २९**

बीड । प्रतिनिधी

राज्यातील पहिली ते बारावीपर्यंत विविध शाळांत बोगस पटसंख्या दाखवून शिक्षकांची भरती केली जात आहे. याला आळा बसवण्यासाठी आणि विद्यार्थांचा सर्व डेटा एकाच क्लिकवर त्यांना मिळावा यासाठी शासनाच्या वतीने २८ ऑक्टोबर २०२४ पासून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अपार आयडी कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अपार कार्ड,आधार कार्ड लिंक असल्याने बोगस विद्यार्थ्यांची संख्या उघड होणार आहे. ३० नोव्हेंबर २०२४ ही शेवटची




तारीख संपूनही ६ डिसेंबरपर्यंत बीड जिल्ह्यातील २७१ शाळांनी एकाही विद्यार्थ्याची नोंद केली नाही. आता १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील समग्र शिक्षा विभागाच्या वतीने अपार आयडीचे काम सुरू आहे. हे अपार कार्ड विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची सर्व कागदपत्रे असणार आहेत. त्यामुळे त्यांना भविष्यात कसलीही अडचण येणार नाही. शिवाय हे अपार कार्ड आधार कार्डशी लिंक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर देशात कुठेही विद्यार्थ्यांचा प्रवेश असेल तर ते एका क्लिकवर समजणार आहे. मात्र यातून संस्थाचालकांची बोगसगिरी उघड होणार आहे. त्यामुळे अनेकांनी विद्यार्थ्यांचे अपार कार्डच काढले नाही.

▶आधार कार्डमुळे अडथळा अपार कार्ड नोंदणीसाठी विद्यार्थ्यांचे आधार यूडायस पोर्टलवर व्हॅलिड असणे आवश्यक आहे. यूडायसवर आधार कार्ड व्हॅलिड केल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आधार कार्ड दुरुस्त केलेले आहे. त्यामुळे आधार कार्डमध्ये तफावत आल्यानेही अपार नोंदणीसाठी अडचण निर्माण होत आहे

▶२ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी बाकी बीड जिल्ह्यात ३ हजार ७०७ शाळा–महाविद्यालये असून ५ लाख १३ हजार ७८९ विद्यार्थी संख्या आहे. आतापर्यंत ६२.३३ टक्के म्हणजे म्हणजे ३ लाख २० हजार २४७ विद्यार्थ्यांची अपार कार्डसाठी नोंदणी झाली आहे. १ लाख ९३ हजार ५४२ विद्यार्थ्यांची अद्याप नोंदणीच नाही.

▶ अपार आयडी पालकांनी काढून घ्यावी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाचे अपार कार्ड आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचे संपूर्ण कागदपत्र त्यामध्ये असणार आहेत. एका शाळेतून दुसऱ्या शाळेत या कार्ड मुळे सहज प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे पालकांनी शाळेत जाऊन स्वात: आपल्या मुलांचे अपार आयडी काढून घ्यावेत. बीड जिल्ह्यात आतापर्यंत ६२. ३३ टक्के काम झाले असून शिक्षकांना या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. –एस.एम. रणदिवे, जिल्हा संगणक प्रोग्रामर

# शिवसेना केज तालुका प्रमुखपदी पृथ्वीराज पाटील

## एकनाथ शिंदे साहेबांनी तरुणांना संधी दिली : सचिन मुळूक



बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांच्या आदेशाने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेना केज तालुका प्रमुख पदी पृथ्वीराज पाटील यांचे निवड झाली. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केजमध्ये तरुणाला संधी दिली असून केज तालुक्यात पाटील यांचा दांडगा जनसंपर्क आहे. यामुळे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पाटील यांचा शिवसेनेला नक्कीच फायदा होईल असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला.

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर केज तालुका शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक शनिवारी (दि.७) पार पडली. या बैठकीत पृथ्वीराज पाटील यांची शिवसेना केज तालुका प्रमुखपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, केज तालुक्यातील विविध सामाजिक कार्यक्रमात पृथ्वीराज पाटील यांचा सक्रीय सहभाग आहे. यामुळे पाटील कुटुंबीय संपुर्ण बीड जिल्ह्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रात परिचित आहे. केज तालुक्यात व केज मतदारसंघात पाटील कुटुंबाचा दांडगा जनसंपर्क असून आगामी पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पृथ्वीराज सुरेशराव पाटील यांची नियुक्ती शिवसेनेसाठी फायदेशीर ठरणार आहे असे सचिन मुळूक म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनीही पृथ्वीराज पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित शिवसेनेचे जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे , युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, शहर प्रमुख बालासाहेब पवार , तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे , उपतालुकाप्रमुख चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, ज्येष्ठ शिवसैनिक डॉ. संतोष बुडुक, युवा सेना शहरप्रमुख आकाश चाळक तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त एस.के. एच महाविद्यालयात भव्य रक्तदान शिवीर

बीड । प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव लोकनेते माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय द्वारा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिराचे घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन लोकनेते जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक गिरीष देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाचे सल्लागार तथा काकू- नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, सुनील पांगारकर, सुभाष क्षीरसागर, सतिश राठौर, प्रकाश राठोड, परमेश्वर धारकर, श्रीराम कुर्हे, जयश्री विधाते, उपप्रचार्य डॉ.गणेश पांगारकर, विलास विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एच एम एम विभागाचे प्रा.डॉ. शेख नासेर, डॉ.वैभव शहापुरे, डॉ. अशोक शिंदे, ग्रंथपाल डॉ.गणेश खेमाडे, सहाय्यक ग्रंथपाल सौ. उषा राऊत, राणी रणखांबे यांचे सह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे दादा कुंबकर, गौतम मैरठ, आर.एस.खेडकर, नितीन सोळंके, बालाजी घुले, अक्षय घुले, मयुरेश गायकवाड यांनी रक्त संकलन केले.




शिबिराच्या यशस्वीतेसाठी आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा.राजा मचाले, डॉ. विवेक दुसाने, उमेश वाघमारे, ज्योतिबा काळे, दत्ता आघाव यांनी परिश्रम घेतले. यावेळी फार्मसी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. अंजली पवार, डॉ.मीना हंगे, डॉ. सोनल बाहेती, डॉ. मीना भस्मे, डॉ.अंजली क्षीरसागर,डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ.सुरेश तोष्णीवाल, डॉ.शेख जाफर, डॉ.ज्ञानेश्वर जोशी, डॉ.राजेश कुलकर्णी आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात अनुराग बुरांगे यांच्या इ फोटोग्राफीच्या भव्य उद्घाटन प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वरजी सातपुते सर यांनी उपस्थित राहून बुरांगे सर व त्यांचा मुलगा अविनाश बुरांगे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित केज पंचायत समितीचे माजी सभापती संदीपजी पाटील,शिवसेनेचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, आनंद वाघ सर,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर सह सर्व पदाधिकारी.*




*माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर यांच्या वाढदिवसा निमित्त प्राथमिक व माथ्यमिक आश्रम शाळा पोखरी येथे मोठ्या उत्सवात रक्तदान शिबीर संपन्न झाले. या वेळी शिक्षक वृंद व सामाजिक कार्यकर्ते संभाजी डोईफोडे छायाचित्र दिसत आहेत.*

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षकपदी डॉ. केतन गायकवाड यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

हरियाणा (रोहतक) येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र शालेय १९ वर्षाखालील मुलांच्या कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी एन.आय.एस. कोच प्रा .डॉ. केतन गायकवाड यांची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे एन.आय.एस. कोच प्रा डॉ. केतन गायकवाड यांची शासनाने नियुक्ती केली आहे. शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमी चे उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा.डॉ.केतन गायकवाड यांची निवड झाल्याने त्यांच्या रूपाने बीड जिल्ह्यातल्या ग्रामीण भागाला



प्रतिनिधित्व मिळाल्याने क्रीडा जगताप आनंद व्यक्त केला जात असून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमी मध्ये राज्यातील व राज्याबाहेरील खेळाडूंना तंत्रशुद्ध कबड्डी प्रशिक्षणाचे धडे ते देत आहेत.

तसेच जिल्ह्यातील विविध नवोदित होतकरू खेळाडूंना कबड्डीचे प्रशिक्षण देत आहे. सातत्याने कबड्डी खेळातील विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचे काम प्रा. डॉ. गायकवाड यांनी केले आहे. खेलो इंडिया युथ गेम्स कबड्डी प्रशिक्षक पदी निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री शिवाजीराव पंडित, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब, जय भवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंग पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान आ.विजयसिंह पंडित, युवा नेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, स्विय्य सहाय्यक अमृत डावकर, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव तथा प्राचार्य डॉ विश्वास कदम, प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा. काशिनाथ गोगुले, निवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुहासिनी देशमुख, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, बलभीम महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. वसंत सानप, आर. बी. अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनीताई शिखरे, राष्ट्रीय खेळाडू दगडू चव्हाण, प्रा. राजेंद्र बरकसे, प्रा. डॉ. भागचंद सानप, प्रा. डॉ. शंकर धांडे, प्रा. डॉ. राजेश क्षीरसागर, मधुकर अण्णा गर्जे ,डॉ. ब्रह्मनाथ मेंगडे प्रा. जगदाळे डॉ नागनाथ मोटे, प्रा. डॉ. दत्तापुरे डॉ .संतोष घोरपडे, गोपाल मोटे, नितीन निंबाळकर, कैलास जगदाळे, प्रताप शेंडगे, वनराज गिरी, विजय जाहेर, विजय अपसिंगेकर, प्रा. रविंद खरात, मयूर मोटे आदींनी प्रा.डॉ. केतन गायकवाड यांचे अभिनंदन करून खेलो इंडिया युथ गेम्स साठी त्यांना आणि संघाला शुभेच्छा दिल्या.

# दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रहण सुटेना एकच वैद्यकीय अधिकारी असल्याने रूग्णांची हेळसांड

### ▶ वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी डॉ. उल्हास गंडाळ यांना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणी कमी होण्याचे चिन्ह दिसेनात.दासखेडचे भुमिपुत्र आणि मुख्यमंत्र्यांचे तत्कालीन ओएसडी कृष्णा जाधव यांच्या पाठपुराव्यातुन तब्बल २ कोटी ६३ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व सुविधांनी सुसज्ज ईमारत पुढा-यांच्या श्रेयवादात उद्घाटनाच्या प्रतीक्षेत २ वर्षांपासून धुळखात पडुन होती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.सरीता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांना लेखी तक्रार केल्यानंतर





त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ. उल्हास गंडाळ यांना उद्घाटनाची प्रतिक्षा न करता प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.त्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासून दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा सुरू झाली. त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ.पुजा माने आणि डॉ.शरयु पडोळे यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र गेल्या ४ महिन्यांपासून केवळ डॉ.शरयु पडोळे याच आरोग्य सेवा देत असुन डॉ.पुजा माने या ४ महिन्यांपासून अद्याप रूजु झाल्याच नाहीत. सध्या कडाक्याच्या थंडीमुळे सर्दी, घसादुखी, श्वसन विकारांच्या रुग्णांत वाढ झाली असुन लहान मुलांसह वृद्ध नागरीक व महिला व पुरुष यांची भर पडली असुन एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांवर प्राथमिक आरोग्य केंद्राची मदार असल्याने रूग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असुन तातडीने त्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य आधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर अतिरिक्त शारीरिक व मानसिक ताण

दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात ४ शिपाई,१ आरोग्य सेवक,१ औषधी निर्माता,१ कनिष्ठ लिपिक,१ लॅब टेक्निशियन , मुख्यमंत्री लाडका भाऊ योजनेंतर्गत १ महिला आरोग्य सहाय्यक यांची पदभरती करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ५०-६० रूग्ण तपासणीसाठी येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणाऱ्या एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर याचा शारीरिक व मानसिक ताण पडत आहे. तसेच काही कामानिमित्त रजा घेतली तर मात्र रूग्णांची अडचण निर्माण होऊन त्यांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करत पाटोदा येथील रूग्णालयात जावे लागते.

रूजू न झालेल्या डॉ. पुजा माने यांना अनाधिकृत गैरहजर प्रकरणी नोटीस पाठवली आहे ; वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी उपसंचालक आरोग्य सेवा यांना पत्रव्यवहार केला आहे :- डॉ.उल्हास गंडाळ ; जिल्हा आरोग्य अधिकारी बीड

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती देण्यात आलेल्या डॉ.पुजा माने यांना दि.०७ मार्च पासुन कोणताही रजेचा अर्ज कार्यालयास सादर न करता अनाधिकृत रित्या गैरहजर राहिल्याने सेवा समाप्तीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल व शिस्त भंग विषयक कारवाई करण्यात येईल अशी नोटीस बजावुन उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडळ लातुर यांना कळविण्यात आले असुन लवकरच वरीष्ठांच्या आदेशाने प्राथमिक आरोग्य केंद्रात दुसऱ्या वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल व आरोग्य सेवेत अडचण येणार नाही असे डॉ.उल्हास गंडाळ यांनी डॉ.गणेश ढवळे यांना सांगितले.